# बोदवड महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले वाटप

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड  येथे विद्यार्थी विकास कक्ष व तहसील कार्यालयाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्वरित उत्पन्नाचे दाखले वाटप करण्यात आले.

उत्पन्न दाखले वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी होते, तर बोदवड तालुक्याचे तहसीलदार श्री रविद्र जोगी, नायब तहसीलदार श्री. वाडीले हे प्रमुख अतिथी म्हणून उस्थित होते. याप्रसंगी सुमारे ७८ विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीचे उत्पन्नाचे दाखले वाटप करण्यात आले.

विद्यार्थी विकास कक्षाचे प्रमुख प्रा. नरेंद्र जोशी, डॉ. व्ही. पी. चौधरी आणि डॉ. गीता पाटील यांनी हा उपक्रम राबवून कार्यक्रम यशस्वी केला. या प्रसंगी कमीत कमी शासन आणि जास्तीत जास्त सेवा याचा लाभ प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना होत असल्याचे प्रतिपादन प्राचार्य अरविंद चौधरी यांनी केले. तर विद्यार्थी हितासाठी तत्पर सेवा उपलब्ध असेल, विद्यार्थ्यांनी देखील शासनस मदत करावी अशी अपेक्षा श्री रवींद्र जोगी यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी.एस.महाले यांनी केले तर आभार प्रा. नरेंद्र जोशी यांनी मानले या कार्यक्रमास मोठया संख्येने विद्यार्थी उपलब्ध होते.






